गडचिरोली, दिनांक ०८/०७/२०१७

***गडचिरोली पोलीस दलासमोर ६ लाखांचे बक्षिस असलेला एरिया कमिटी सदस्यासह एकूण १६ लाखांचे बक्षिस असणाऱ्या ५ जहाल नक्षल्यांचे आत्मसमर्पन***

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या आत्मसमर्पन योजनेमुळे गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी मोठया संख्येने आत्मसमर्पन करीत आहेत. आतापर्यंत वरिष्ठ नक्षल सदस्यांसह अनेक जहाल नक्षल्यांनी आत्मसमर्पन केल्याने व पोलीस दलाने त्यांचे पुनर्वसन घडवून आणल्याने नुकतेच चालू आठवडयामध्ये एकूण १६ लाखांचे बक्षिस असलेल्या ०५ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पन केले आहे. यामुळे गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी चळवळीला जबर धक्का बसला आहे. गडचिरोली पोलीसांनी आतापर्यंत केलेली कामगिरी तसेच जनतेचा संपादन केलेला विश्वास यामुळे नक्षलवादी मोठयाप्रमाणात आत्मसमर्पन करीत आहेत. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. शरद शेलार सो. व मा. पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपुर श्री. अंकुश शिंदे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक सो. डॉ. अभिनव देशमुख यांच्या समोर ०५ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पन केले आहे. आत्मसमर्पण केलेल्या लोकांची नावे खालीलप्रमाणे

१) **<u>जग्गु ऊर्फ जयराम कोमटी गावडे</u>** - हा प्लाटून क्रमांक १४ एसिएम सदस्य म्हणून कार्यरत होता. तो सन २००७ ला भामरागड दलममध्ये सदस्य पदावर भरती झाला होता. त्यानंतर तो भामरागड मिलीशिया कमांडर व प्लाटून क्रमांक १४ एसिएम सदस्य म्हणून कार्यरत होता. बेजुरपल्ली चकमक, येर्रागुडा चकमक, तोंडेर चकमकीसह लाकडीबीट जाळपोळ, खुन अशा एकूण १७ गंभीर गुन्हयात त्याचा सहभाग होता. शासनाने त्याचेवर ६ लाखांचे बक्षिस जाहिर केले होते.

२) **<u>रासो ऊर्फ देवे झुरू पुंगाटी</u>** - ही प्लाटून क्र. १४ ची सदस्या म्हणून कार्यरत होती. तिच्यावर ४ लाखांचे बक्षिस होते. ती सन २००९ मध्ये भामरागड एलओएस सदस्य म्हणून भरती झाली होती. मलमपदूर चकमक, नैनेर चकमक, नारगुंडा चकमक, आशा चकमक, मौजा येडमपल्ली येथील इसमाचा खुन या गुन्हयात ती सहभागी होती.

३) **<u>सुशिला ऊर्फ सन्नी बुस्कु पुंगाटी</u>** - ही मास टिम सदस्या म्हणून कार्यरत होती. तिच्यावर २ लाख बक्षिस होते. सन २००६ मध्ये बासागुडा दलममध्ये भरती झाली होती.

४) **<u>रैजी ऊर्फ भारत ऊर्फ कोरसा ऊर्फ अनिल बुधू गावडे</u>** - हा मास टिम सदस्य म्हणून कार्यरत होता. सन २००३ मध्ये कसनसुर एलओएस मध्ये सदस्य पदावर भरती झाला होता. कोटमी चकमक, मेंढरी चकमक, बॅनर व पत्रके टाकणे या गुन्हयात तो सहभागी होता. त्याच्यावर २ लाख बक्षिस होते.

५) **<u>कमलेश लच्छु तेलामी</u>** - हा भामरागड दलम सदस्य म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षिस होते. तो सन २०१२ मध्ये भामरागड दलममध्ये भरती झाला होता. विविध चकमकी, खुन अशा गुन्हयांमध्ये त्याचा सहभाग होता.

आत्मसमर्पन केलेल्यांपैकी रैजी ऊर्फ भारत गावडे व सुशिला ऊर्फ सन्नी बुस्कु पुंगाटी आणि जग्गु ऊर्फ जयराम कोमटी गावडे व रासो ऊर्फ देवे झुरु पुंगाटी हे पती-पत्नी आहेत. पोलीस विभागाने आत्मसमर्पन करण्याचे केलेले आवाहन व शासनाची आत्मसमर्पन योजना आणि पोलीस दलाने भुखंड, आर्थिक मदत, रोजगाराची उपलब्धता, नसबंदी रिओपनिंग यांसारख्या माध्यमातून आत्मसमर्पीतांचे पुनर्वसन घडवून आणल्याने सन २०१७ या चालु वर्षात आतापर्यंत एक एरिया कमिटी सदस्यासह विविध दलमच्या तब्बल १६ नक्षल सदस्यांनी आत्मसमर्पन करून नक्षल चळवळीला जबर हादरा दिला आहे. आत्मसमर्पित लोकांच्या आत्मसमर्पणातून प्रेरणा घेवून दलममध्ये कार्यरत ईतर सदस्यही नक्कीच आत्मसमर्पण करतील असा विश्वास डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी दर्शविला आहे. यासोबतच पोलीस अधिक्षकांनी दलममध्ये कार्यरत नक्षल सदस्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन करुन आत्मसमर्पण योजना अधिक प्रभाविपणे राबवून अधिकाधिक नक्षल सदस्यांचे आत्मसमर्पण घडवून आणण्याचे संकेत दिले आहेत.





